IIP: WJHSS
IIP
World Journal of Humanities and Social Sciences

An Online Peer-Reviewed / Refereed Journal
Vol: 02 No. Issue I, (January-March) (2026)
Impact Factor: IIFS: 5.75
ISSN: 3107-6661 (Online)

# महात्मा बसवेश्वरांचे समतावादी तत्त्वज्ञान

**डॉ. बाळासाहेब मुळीक**
सहाय्यक प्राध्यापक
तत्त्वज्ञान विभाग, शंकरराव मोहिते महाविद्यालय, अकलूज

**Article Info**

***Article History:***
Received: 20th February 2026
Accepted: 01st March 2026
Published: 07th March 2026

***Keywords:***
*बसवेश्वर, नैतिक, समता, लिंगायत तत्त्वज्ञान, संप्रदाय कायक, दासोह, सामाजिक न्याय, मूल्य, मानवतावाद, अनुभव मंटप*

**ABSTRACT**

भारतात इसवी सन 12 व्या शतकामध्ये समाजात जातिभेद, अस्पृश्यता, स्त्रीदास्य आणि कर्मकांड प्रधान धार्मिक प्रथा मोठ्या प्रमाणात होती. कर्नाटक राज्यात अशा परिस्थितीत लिंगायत संप्रदाय उदयास आला. या संप्रदायाच्या माध्यमातून महात्मा बसवेश्वरांनी समता दृष्टीत मानवतावादी व नैतिक मूल्यांवर आधारित असणारी समाजरचना मांडली. महात्मा बसवेश्वर हे समाज सुधारक व तत्वज्ञ होते. त्यांच्या विचारातील प्रमुख तत्वे ही अनुभव, नैतिकता आणि सामाजिक समता यावर आधारित होती. त्यांच्या तत्त्वज्ञानात कायक तत्व (श्रम हेच परमपूज्य), दासोह तत्व (निस्वार्थी सेवा, सामूहिक कल्याण), समता व जातीन निरपेक्षता, स्त्री - पुरुष समानता, अनुभव प्रधान अध्यात्म, इस्टलिंगतत्व, नैतिक आचरण धर्म व सामाजिक परिवर्तन या तात्विक संकल्पनांचा समावेश होतो. प्रस्तुत संशोधन पेपर मध्ये बसवेश्वरांच्या समतावादी तत्त्वज्ञानाचे ऐतिहासिक, तात्विक आणि सामाजिक विश्लेषण केलेले आहे. त्याचबरोबर आधुनिक लोकशाही, मानवाधिकार आणि सामाजिक न्याय या मूल्यांची उपयुक्तता स्पष्ट केली आहे. प्रस्तुत संशोधन पेपरच्या अभ्यास मांडणीने बसवेश्वरांचे तत्वज्ञान हे जसे धार्मिक सुधारणा दर्शविते तसेच ते सामाजिक क्रांतीचे तात्विक अधिष्ठान आहे हे सिद्ध केले आहे.

***Plagiarism Check Report:***
Date of Report: March 01, 2026
Similarity Index: 5%
Remarks: No significant matching text. All citations and matches are properly referenced. The manuscript is considered original.

Copyright © 2026 The Author(s). This is an open access article distributed under the Creative Commons Attribution License, (http://creativecommons.org/licenses/by/4.0/) which permits unrestricted use, distribution, and reproduction in any medium, provided the original work is properly cited.

**How to Cite: Mulik, Balasaheb.** (2025). महात्मा बसवेश्वरांचे समतावादी तत्त्वज्ञान. *IIP: World Journal of Humanities and Social Sciences (IIPWJHSS)*, 2(I), **239–243**.

**प्रस्तावना -**

भारतीय तत्त्वज्ञानाच्या परंपरेत वेद - उपनिषदांच्या अध्यात्मिक पातळीपासून बुद्ध, महावीर, संत परंपरा आणि आधुनिक समाजसुधारकांपर्यंत विचारांची तत्त्वज्ञानाची अखंड परंपरा आहे. याच परंपरेत महाराष्ट्रात वारकरी संप्रदायाचा विकास होत असताना इसवी सन 12व्या शतकामध्ये कर्नाटक राज्यात बसवेश्वरांचे तत्त्वज्ञान उदयास आले. वारकरी संप्रदायाला वैष्णव विचारांचे तर लिंगायत संप्रदायाला शैव विचारांचे अधिष्ठान लाभले. त्याचा विस्तार प्रामुख्याने दक्षिण भारतात झालेला आहे. या संप्रदायाचे अनुयायी आपल्या अंगावर शिवलिंग धारण करतात म्हणून त्याला लिंगायत संप्रदाय म्हणतात. हा संप्रदाय 'वीरशैव संप्रदाय' म्हणून ओळखला जातो. शिव हा सर्व शक्तिमान असून जीव हा शिवाचा अंश आहे. झाडाला जसे फुल व फळ येते तसे शिवापासून जगत उत्पन्न होते असे हा पंथ मानतो. जगाची उत्पत्ती होणे व त्याचा विनाश होणे हा विचार वीरशैवांना मान्य नाही. जगाचा शक्ती विकास होतो हे त्यांचे मत आहे. ओम नमः शिवाय हा उपासना मंत्र या पंथाने स्वीकारला आहे.

**गृहीतके:**

1) बसवेश्वरांचे समतावादी तत्त्वज्ञान स्पष्ट करणे.
2) बसवेश्वरांच्या वचन साहित्यातील समतेचे तात्विक विश्लेषण करणे.
3) बसवेश्वरांच्या तात्विक समतेच्या संकल्पनेचा आधुनिक लोकशाही व मानवाधिकार यांच्याशी संबंध स्पष्ट करणे.
4) प्रस्तुत समाजातील उपयुक्तता अधोरेखित करणे.

बसवेश्वरांनी कर्नाटकातील कर्मभूमीत (११३१-११६७) लिंगायत संप्रदायाचे पुनरुज्जीवन केले. त्यांनी धर्म, समाज, तत्त्वज्ञान, साहित्य राजकारण यासारख्या क्षेत्रात क्रांतिकारक कार्य केले. बसवेश्वरांना वर्णभेद, वर्गभेद,यज्ञयागातील पशुहत्या मान्य नव्हती. 'शिव' हाच एकमेव ईश्वर असल्याची घोषणा करून त्यांनी शिव शिवोपासनेचा पुरस्कार केला. एकाच देवाची भक्ती करा भूतदया दाखवा परोपकार करा अशी त्यांची शिकवण होती. बसवेश्वरांनी जे शिवभक्त आहेत त्यांच्यामध्ये भातृभाव निर्माण करण्याचा प्रयत्न केला व त्यांना आर्थिक व राजकीय फायदे करून दिले.

**महात्मा बसवेश्वरांचे समतावादी तत्त्वज्ञान:**

बसवेश्वरांच्या समतावादी तत्त्वज्ञानाचा मूळ आधार त्यांची वचने बसव समिती यात आहे. बसवेश्वरांच्या स्वतःच्या रचना कानडी भाषेत आहेत. त्यांची सर्व वचने सर्व लोकांमध्ये लोकप्रिय आहेत. त्या सर्व वचनांमध्ये शिवाविषयी असणारा भक्ती भाव व्यक्त झालेला आहे. बसवेश्वरांना शिवाचे 'प्रभू कुंडल संगम' या रूपाने दर्शन झाले होते असे म्हणतात. बसवेश्वर स्वतःला भगवान शिवाचा नम्र दास म्हणून स्वीकारतात. बसवेश्वरांची वचने संतांचे वचनांसारखीच ईश्वर प्रेमाने व भक्तिभावाने ओथंबलेली व रसाळ आहेत. पाच वचनातून समतेचे तत्त्वज्ञान स्पष्ट होते. तत्कालीन समाज व्यवस्थेत त्यांनी विषमतेवर भाष्य करून जातीभेद नष्ट होण्यासाठी प्रयत्न केले. महात्मा बसवेश्वरांचे समतावादी तत्त्वज्ञान जाती निरपेक्षता, कायक, दासोह, स्त्री- पुरुष समानता, इष्टलिंग व आध्यात्मिक समता या मुलभूत तत्वांच्या आधारे स्पष्ट करता येईल.

**जाती निरपेक्षता:**

महात्मा बसवेश्वरांची जातीनिर्पेक्ष विचारधारा हे त्यांच्या तत्त्वज्ञानाची मुख्य वैशिष्ट्ये होती. बसवेश्वरांनी समाजातील जातीभेदाला ठाम विरोध केला. त्यांच्या मते जात ही जन्मावर आधारित नसून ते कर्मावर आधारित असल्याचे मानावे. जो शिवभक्त असतो तो कोणत्याही जातीचा असला तरी त्याला समानतेचा दर्जा देऊन त्याचा शिवभक्त म्हणून स्वीकार करावा. ब्राह्मण, शूद्र, स्त्री, अस्पृश्य असा आपण कोणताही भेद करू नये. समतेचे प्रतीक म्हणून जो अनुभव मंटप आहे,त्यामध्ये सर्व जातीचे लोक एकत्र बसून आपले विचार मांडत असतात. असे म्हणता येईल की त्या काळातील जगातील 'अनुभव मंटप' ही पहिली लोकशाही सभा असेल. सर्व जाती-धर्माचे न्यायनिवाडे अनुभव मंटपात होत असत. तत्कालीन परिस्थितीत विषमता मोठ्या प्रमाणात होती. जातीभेदाची बीजे खोलवर रुजलेली असतानाही ब्राह्मण मुलीचा चांभार मुलाशी लग्न लावून प्रत्यक्ष समाज व्यवस्थेला बसवेश्वरांनी धक्का दिलेला होता. हीच त्यांची प्रत्यक्ष कृती समानतेचा पुरस्कार करते.

**कायक:**

श्रमाला प्रतिष्ठा,"कायकवे कैलास"या वचनातून बसवेश्वरांनी श्रमाला प्रतिष्ठा देऊन सर्वोच्च स्थान दिले. कोणतेही काम खालच्या दर्जाचे नाही. सर्व श्रम पवित्र असते. 'घोर परिश्रम' हेच त्यांचे ब्रीद होते. त्यामुळे आजूबाजूचे लोकही निष्क्रियता, आळस झटकून कामाला वेळ देऊ लागले. काम करताना कोणतेही काम हाताचे असो किंवा बुद्धीचे असो त्यास समान समजावे. स्वतःच्या श्रमाने आपली उपजीविका करावी. परजीवी जीवन कोणीही जगू नये. आपण स्वतः काम करून खावे आणि सामानाने जगावे. कोणत्याही देवळात जाऊन देवाची पूजा करण्यापेक्षा आपले काम हीच खरी पूजा आहे असे समजावे. कायकामुळे श्रमाला सर्वोच्च स्थान दिल्यामुळे जातीभेद कमी होतो. आर्थिक समता वाढते व आपल्यामध्ये स्वाभिमान निर्माण होतो.

**दासोह:**

(सामूहिक कल्याण)-दासोह या तत्त्वानुसार स्वतः प्रामाणिकपणे मिळविलेल्या संपत्तीचा समाज हितासाठी उपयोग करणे. कोणताही जातीभेद उच्च- नीच हा फरक न करता सर्वांना समान मानून प्रसिद्धी किंवा फळाची अपेक्षा न ठेवता निस्वार्थ वृत्तीने समाजाची सेवा करीत राहणे. आपण कमावलेल्या संपत्तीचा संचय न करता ती संपत्ती समाजासाठी वापरावी. समाजामध्ये जे दुर्बल घटक आहेत त्यांच्या सेवेसाठी संपत्तीचा वाटपाच्या स्वरूपात वापर करण्यात यावा. यामध्ये स्त्री आणि पुरुष यांना समान पातळीवर सहभागी करून घ्यावे व समान पद्धतीचे भेदभावशिवाय अन्न वाटप करणे तसेच वेळ,श्रम, ज्ञान आणि कौशल्य यांचे समाजहितासाठी अर्पण हेही दासोहच आहे.

**स्त्री- पुरुष समानता:**

महात्मा बसवेश्वरांनी स्त्रिया आणि पुरुषांना अध्यात्मिक आणि सामाजिक क्षेत्रात समान स्थान दिलेले आहे. अक्का महादेवी, नेत्रावती, गंगाम्बिका यासारख्या स्त्रीशरणांना त्यांनी नेतृत्व दिले. अनुभव मंटप येथे सर्व जाती धर्मातील स्त्रिया एकत्र येऊन विचार विनिमय करीत असत. स्त्री ही केवळ पुरुषाची संपत्ती नसून ती सहजीवनातील समान भागीदार आहे असे त्यांचे मत होते. स्त्री आणि पुरुष हा फरक सामाजिक दृष्ट्या आहे तर अध्यात्मिक पातळीवर दोघेही समान आहेत असे बसवेश्वरांचे मत होते.

"दासीपुत्र असो, वेशापुत्र असो,
लिंग दीक्षा झाल्यावर साक्षात शिव मानून,
वंदून, पूजून तयाचे पादोदक - प्रसाद
स्वीकार करणेच योग्य.
असे न करता, तिरस्कार करणाऱ्यास
पंचमहापातक नकर पहा हो,"
- कुडलसंगमदेवा (ब. व.क्र.१२२३)

स्त्रीला पत्नी किंवा आई या भूमिकांपुरते मर्यादित न ठेवता त्यांना स्वतंत्र व्यक्ती म्हणून मान्यता द्यावी असा त्यांचा विचार होता. महात्मा बसवेश्वरांनी भारतीय समाजाला एकसंघ करण्यासाठी दिलेली पहिली शिकवण म्हणजे हा आमुचा, हा आमुचा,हा आमुचा म्हणावावे, ही होय.

**अनुभव मंटप:**

अनुभव मंटप हे खऱ्या अर्थाने बसवेश्वरांचे लोकशाही समतेचे व्यासपीठ होते. अनुभव मंटपात सर्व जाती-धर्मातील लोक सहभागी होऊन मुक्तपणे विचार मांडत असत. तत्कालीन परिस्थिती सर्वांना अनुभव मंटपात वैचारिक स्वातंत्र्य होते. अनुभव मंटपात अध्यात्मिक सामाजिक आणि नैतिक प्रश्नांवर मुक्तपणे चर्चा होत असे. अनुभव मंटप हे भारतीय सामाजिक धार्मिक इतिहास येथील एक क्रांतिकारक पाऊल मानले जाते. 'अनुभव' म्हणजे प्रत्यक्ष अनुभूती आणि 'मंटप' म्हणजे सभा किंवा व्यासपीठ होय.

ज्या ठिकाणी प्रत्येकाला स्वतःच्या आध्यात्मिक आणि सामाजिक अनुभवांचे मुक्तपणे विचार मांडण्याचे स्वातंत्र्य होते असे ठिकाण म्हणजे अनुभव मंटप होय. अनुभव मंट पामुळे तत्कालीन समज रजनीत मोठे आव्हान निर्माण झाले आणि सामाजिक परिवर्तनाला गती मिळाली. अनुभव मं टपामुळे सामाजिक संवाद व सलोखा यात वाढ होऊन सर्वांना अभिव्यक्ती स्वातंत्र्य,समान हक्क व विचार स्वातंत्र्य मिळाले. बसवेश्वरांची अनुभव मंटप संकल्पना ही एक सामाजिक क्रांतीची प्रयोगशाळा होती. सामाजिक समतेसाठी अनुभव मंटप प्रेरणादायी ठरते.

**इष्टलिंग व आध्यात्मिक समता:**

विषमतेने ग्रासलेल्या समाजात समता प्रस्थापित करण्यासाठी महात्मा बसवेश्वरांनी इष्टलिंग उपासनेचे संकल्पना अस्तित्वात आणली. इस्टलिंग धारणेने वर्ण, वंश, जात व लिंग यांचा पूर्वाश्रय नष्ट होऊन सर्वजण समान होतात अशी ग्वाही दिली. ईश्वराशी नाते ठेवण्याचा अधिकार इष्टलिंग तत्त्वानुसार आहे. यामध्ये कोणीही मध्यस्थ, पुरोहित वर्ग लागत नाही. प्रत्येक व्यक्ती ईश्वराला भेटण्यासाठी येते तेव्हा अध्यात्मिक व धार्मिक स्तरावर विषमता असता कामा नये. या दोन्ही पातळीवर प्रत्येक व्यक्ती समान आहे. इस्टलिंग म्हणजे प्रत्येक भक्ताने आपल्या गळयात धारण केलेले छोटे लिंग होय. शिवलिंग हे देवाचे प्रतीक आहे. तेथेच देवाशी वैयक्तिक नाते प्रस्थापित करते. देवाची उपासना करताना मंदिर, पुजारी यांची आवश्यकता लागत नाही. बसवेश्वर सांगतात की, ईश्वर प्रत्येकाच्या अंतःकरणात आहे. त्यामुळे त्याला अनुभवण्यासाठी बाहेरच्या गोष्टींची आवश्यकता लागत नाही. इस्टलिंग हे केवळ उपासनेची रीत नसून त्या अध्यात्मिक समतेचे प्रतीक आहे. इस्टलिंगामुळे "देव माझ्यात आहे आणि मी देवात आहे" ही श्रद्धा अधिक बळकट होत गेली. तसेच तत्कालीन परिस्थितीत सामाजिक परिवर्तन घडवून आले त्यामध्ये सामाजिक समतेचा विस्तार झाला आणि वैयक्तिक नीतीवर विश्वास प्राप्त झाला तसेच कर्मकांडाचा प्रभाव कमी झाला समाजातील भेदभाव कमी होऊन प्रत्येकाला समान स्तरावर आणण्याचा प्रयत्न झाला.

**बसवेश्वरांच्या समतावादी तत्त्वज्ञानाची प्रस्तुतता**:

बसवेश्वरांच्या समतावादी तत्त्वज्ञानाची प्रस्तुतता विशद करताना त्यांच्या काळातील ऐतिहासिक पार्श्वभूमी पाहता वर्णव्यवस्था कठोर होती. तसेच अस्पृश्यतेची प्रथा प्रचलित होती. त्याचबरोबर स्त्रियांना सामाजिक आणि धार्मिक अधिकार मर्यादित होते. या पार्श्वभूमीवर बसवेश्वरांनी समानतेवर आधारित असणारी समाज रचना मांडली ती आजही तितक्याच प्रभावीपणे उपयुक्त ठरत असताना दिसते हे नाकारता येत नाही. 'सर्व जीवात शिवतत्व' याचा अर्थ असा की, प्रत्येक जीवात देव आहे तिथे कोणी व्यक्ती श्रेष्ठ- कनिष्ठ नाही,कोणत्याही जाती धर्माची नाही हा व्यापक विचार बसवेश्वरांनी दिला तो प्रस्तुत काळात समतेच्या आधारावर समाजाला पुढे घेऊन जाण्यास प्रेरक ठरतो. अनुभव मंटप हे तर समतेचे व्यासपीठ होते. या व्यासपीठावर सर्व जाती धर्माचे लोक एकत्रित येत. येथे मुक्त चर्चा, तर्कशुद्ध संवाद, सामाजिक प्रश्नांवर विचार मंथन होत असे ही कल्पना प्रस्तुत काळात आधुनिक लोकशाहीच्या तत्त्वांशी सुसंगत दिसते.

बसवेश्वरांच्या तत्कालीन परिस्थितीत सामाजिक प्रश्न होते. उदा: जातीभेद, अस्पृश्यता इत्यादी बसवेश्वरांच्या समतावादी तत्त्वज्ञानामुळे जातीभेद विरुद्ध चळवळ, अस्पृश्यतेचा निषेध, श्रमाला प्रतिष्ठा व सामाजिक एकात्मता या गोष्टींचा सामाजिक परिणाम प्रस्तुत काळात दिसतो. कारण बसवेश्वरांच्या समतावादी तत्त्वज्ञानामुळे समाजात नैतिक व सामाजिक परिवर्तनाची प्रक्रिया सुरू झाली. आधुनिक काळातील समानता, धर्म स्वातंत्र्य व सामाजिक न्याय ही मूल्ये बसवेश्वरांच्या विचारांशी सुसंगत आहेत. त्यामुळे समाजाची खऱ्या अर्थाने सामाजिक, आर्थिक, नैतिक, धार्मिक व सांस्कृतिक या मूल्यांच्या आधारे प्रगती होईल.

बसवेश्वरांचे समतावादी तत्त्वज्ञान हे बसवेश्वरांनी ज्या सामाजिक, नैतिक व धार्मिक मूल्यांवर अनुभव मंटपात वचनांच्या आधारे समाजाला दिले. तेच तत्त्वज्ञान भारतातील सर्व संतांनी आपल्या अभंग, श्लोक व ओव्या यांच्या माध्यमातून समाजापर्यंत पोहोचविले. बसवेश्वर व सर्व संत यांनी समाज परिवर्तनासाठी दिलेले योगदान अनन्य साधारण असे आहे. भगवद्गीतेतील तत्त्वज्ञानही बसवेश्वरांचे विचारांशी सुसंगतता दर्शविते. बसवेश्वरांचे समतावादी तत्त्वज्ञान हे भारतीय सामाजिक व तात्विक परंपरेतील एक क्रांतिकारी पाऊल आहे. कायक, दासोह, जाती निरपेक्षता, स्त्री समानता आणि अनुभव मंटप या तत्वांद्वारे त्यांनी

समताधिष्ठित समाज रचनेचा आराखडा दिला. बसवेश्वरांचे तत्त्वज्ञान हे केवळ ऐतिहासिक वारसा नसून आधुनिक काळातील समाजासाठी दिशादर्शक असे तत्त्वज्ञान आहे.

**संदर्भ ग्रंथ:**

1) एम. एम. कलबुर्गी, बसवेश्वर, वचन साहित्य, संपादक, कन्नड विद्यापीठ, हम्पी
2) ग. ना. जोशी, भारतीय तत्त्वज्ञानाचा बृहद इतिहास, खंड ५, शंकरोत्तर वेदांत व शैव दर्शन शुभदा सारस्वत प्रकाशन, पुणे २००५
3) Vaishavism, Saism & Minor Religious System: By R.G. Bhandarkar
4) सुनीलदत्त गवरे, संपादक, संतांचे तत्त्वज्ञान, अथर्व पब्लिकेशन, धुळे, २०२०
5) मराठी विश्वकोश, खंड ११, महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ, मुंबई, १९८२
6) Radhakrishnan,S,(1953),Indian Philosophy,Vol.II
7) नागोराव कुंभार, संपादक, विचारशलाका, वर्ष ३१ जाने. ते सप्टें.२०१७